# शासकीय अध्यापक महाविद्‍यालय, पनवेल

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

## अहवाल

दिनांक – १५ एप्रिल, २०२६

स्थळ – सरस्वती कक्ष

**शासकीय अध्यापक महाविद्‍यालय, पनवेल येथे दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात साजरा झाला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्‍यालयाच्या प्राध्यापिका डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांच्या आयोजना खाली झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्‍यालयच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम होत्या. या कार्यक्रमामध्ये प्रथम वर्षीय छात्राध्यापकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती दाखवून सहभाग घेतला होता. तसेच द्‍वितीय वर्षाचे छात्राध्यापक प्रेक्षक म्हणून उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम खूप सुंदर, उत्कृष्ट, नियोजनबद्ध आणि यशस्वीरित्या संपन्न झाला.**

कार्यक्रमाची सुरुवात ही महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम, सर्व प्राध्यापक वृंद तसेच महाविद्यालयाचे सहसंचालक मा. डॉ. किरण कुमार बोंदर सर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन, सरस्वती पूजन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर प्राचार्यांच्या हस्ते सहसंचालकांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत करण्यात आले.

प्रथमवर्षीय छात्राध्यापिका प्रणिता कदम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सखोल माहिती प्रेक्षकांना दिली. त्यानंतर छात्राध्यापक जयेश नडगे यांनी बाबासाहेबांवर अप्रतिम असे गीत सादर केले. कार्यक्रमाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून काही छात्राध्यापकांनी भाषणेही सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले मॅडम यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ. आंबेडकरांचे मोलाचे विचार छात्राध्यापकांसमोर विशद केले. छात्राध्यापिका अस्मिता बदे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सुत्रसंचालन केले. शेवटी आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

प्रथम वर्ष बी. एड. 2025-26

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंती

## कार्यक्रम पत्रिका

15 एप्रिल 2026

| | |
|---|---|
| सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन | मा. प्राचार्य व सर्व प्राध्यापक वृंद |
| स्वागत | मा.प्राचार्य व सर्व प्राध्यापक वृंद |
| सूत्रसंचालक | श्रीमती.अस्मिता बदे |
| प्रास्ताविक | श्रीमती. प्रणिता कदम |
| गीत | श्री. जयेश नडगे |
| भाषण | प्रियांका कांबळे,प्रणोती कांबळे, विशाल फुफाने |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार | श्री. दत्ता झुगरे |
| फोटोग्राफी,व्हिडिओग्राफी | श्री. प्रल्हाद गावित,श्री.प्रशांत डोकफोडे |
| कार्यक्रम, निमंत्रण पत्रिका | श्रीमती. प्रतिभा चाबके |
| फलक लेखन | श्री. सुनील चौधरी |

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

प्रथम वर्ष बी.एड. २०२५-२०२६

## निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात येत आहे की, दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी, शासकीय अध्यापक महाविद्यालय ,पनवेल येथे, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तरी या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.



**आयोजक**
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

**अध्यक्ष**
मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले

### प्रमुख उपस्थिती

मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार   मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे

स्थळ : सरस्वती कक्ष   वेळ : सकाळी ११.१५ वाजता













**महाविद्यालयाच्या मा. प्राचार्या रमा भोसले मॅडम, सहसंचालक मा. डॉ. किरण कुमार बोंदर सर तसेच सर्व प्राध्यापक वृंद सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करताना.**




छात्राध्यापिका प्रणिता कदम कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना.




छात्राध्यापक जयेश नडगे डॉ. आंबेडकरांवर आधारीत गीत सादर करताना.




छात्राध्यापिका प्रियांका कांबळे जयंती निमित्त आपले भाषण सादर करताना.




छात्राध्यापिका प्रणोती कांबळे बाबासाहेबांवर आपले विचार व्यक्त करताना.




छात्राध्यापक विशाल फूफाणे बाबासाहेबांवर आधारित आपले मनोगत व्यक्त करताना.




मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले मॅडम आपले अध्यक्षीय मनोगत सादर करताना.




छात्राध्यापिका अस्मिता बदे कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन करताना.




छात्राध्यापक दत्ता झुगरे कार्यक्रमाच्या शेवटी आभार व्यक्त करताना.




छात्राध्यापक यश पाटील याने कार्यक्रमा निमित्त काढलेली सुंदर अशी रांगोळी.




छात्राध्यापक सुनील चौधरी याने कार्यक्रमानिमित्त केलेले सुंदर असे फलक लेखन.